दैनिक लोकमत
हॅलो औरंगाबाद
शनिवार, दि. ३० एप्रिल २००

# बालकामगार शाळेत रोजा इफ्तार कार्यक्रम

औरंगाबाद, दि. ११(सांजवार्ता ब्युरो)- आझाद अली शाह शिक्षण संस्था संचलित आरेफ कॉलनी येथील इंडस् बालकामगार शाळेत पवित्र रमजान रोजा इफ्तार कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमास इंडस् प्रकल्पाचे संचालक पॅट्रीक मॉर्टीन, जालन्याचे पी.डी. देशमुख, बालकामगार व प्रशासन संस्थेचे राजू नवगिरे, इंडस् येथील कल्पना भगत, नंदकिशोर राऊत उपस्थित होते.

संस्थेच्या अध्यक्षा शाह सुरैय्या खान यांनी कार्यक्रमाच्या आयोजना मागील हेतू स्पष्ट करून विविध समाजातील, धर्मातील विद्यार्थी, पालक यांच्यामध्ये ऐक्याची प्रेम सद्भावना जागृत करण्याचे उद्दिष्ट या रोजा इफ्तार कार्यक्रमामधून झाले आहे, असे सांगितले. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक, आदींची मोठी उपस्थिती होती. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.